**<u>ठळक बातम्या</u>**

- पेट्रोरासायनिक उत्पादनांवरचं सीमाशुल्क तात्पुरतं रद्द करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- २०२५-२६ या आर्थिक वर्षात संरक्षण उत्पादनांची ३८ हजार ४२४ कोटी रुपये इतकी विक्रमी निर्यात

- ४ अंतराळवीरांना घेऊन नासाच्या आर्टेमिस २ मोहिमेचं उड्डाण यशस्वी

**आणि**

- महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात गारपीट आणि वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने पेट्रोरासायनिक उत्पादनांवरचं सीमाशुल्क तात्पुरतं रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. ही सवलत येत्या ३० जूनपर्यंत लागू राहील. यामुळे प्लास्टिक, वेष्टनं, औषधं, रसायनं, वस्त्रं, वाहनांचे सुटे भाग, खतं आणि इतर औद्योगिक उत्पादनांमधे वापरली जाणारी रसायनं अशा विविध उत्पादनांचा त्यात समावेश आहे. सध्याच्या भूराजकीय संघर्षाचा परिणाम जागतिक पुरवठा साखळीवर झाला असून त्याचा फटका सामान्य ग्राहकांना बसू नये या हेतूनं ही सवलत तात्पुरती दिल्याचं केंद्रीय अर्थमंत्रालयाने स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीची विशेष बैठक काल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. दिल्लीत प्रधानमंत्र्यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीत पश्चिम आशियातल्या संघर्षस्थितीच्या पार्श्वभूमीवर, भविष्यातील उपक्रमांविषयी चर्चा करण्यात आली तसंच विविध मंत्रालयं, विभागांनी

केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. या संदर्भातील ही दुसरी बैठक होती.

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस आहे.

अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा आभार प्रस्ताव सादर करण्यात आला तसंच २०२६-२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प मांडण्यात आला. दुसऱ्या टप्प्यात, संसदेत वित्त विधेयक २०२६ आणि विनियोग विधेयक २०२६ याला मंजुरी मिळाली. या काळात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये पश्चिम आशियामधल्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर सरकारची भूमिका मांडली.

**<><><><><>**

ग्राहकांना विजेचा प्रीपेड मीटर बसवणं अनिवार्य नसल्याचं ऊर्जामंत्री मनोहर लाल खट्टर यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. सरकार खाजगी कंपन्यांप्रमाणेच ग्राहकांना प्रीपेड मीटर स्वीकारण्याची सक्ती करत असल्याचा दावा त्यांनी फेटाळला.

**<><><><><>**

भारतानं २०२५-२६ या आर्थिक वर्षात संरक्षण उत्पादनांची ३८ हजार ४२४ कोटी रुपये इतकी विक्रमी निर्यात केली आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत निर्यातीत १४ हजार ८०२ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. ही वाढ ६२ पूर्णांक ६६ शतांश टक्के इतकी असल्याची माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली.

या निर्यात वाढीत संरक्षण सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचा वाटा ५४ पूर्णांक ८४ शतांश टक्के तर खासगी क्षेत्राचा ४५ पूर्णांक १६ शतांश टक्के वाटा असल्याची माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली. संरक्षण क्षेत्रात वाढलेल्या निर्यातीचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी कौतुक केलं आहे.

**<><><><>**

देशातलं दळणवळणाचं सर्वात प्रभावी माध्यम म्हणून भारतीय टपाल विभागाची वाटचाल होत आहे. इतकंच नाही तर २०३० पर्यंत जागतिक स्तरावरही भारतीय टपाल सेवा स्वतःचा वेगळा ठसा उमटवेल असा विश्वास केंद्रीय दळणवळणमंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी व्यक्त केला आहे. सहारनपूर इथल्या पोस्टाच्या प्रशिक्षण केंद्राला ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त नवी दिल्लीत झालेल्या कार्यक्रमात शिंदे बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते प्रशिक्षण केंद्राच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विशेष टपाल तिकीटाचं प्रकाशनही झालं.

**<><><><>**

विकसित भारताची उभारणी कुशल आणि समर्पित मनुष्यबळाच्या आधारावर होणार असून, 'ईझ ऑफ लिव्हिंग, म्हणजेच 'जीवन सुलभता' आणि जीवनाचा दर्जा उंचावणं, हेच प्रशासनाचं प्रमुख उद्दिष्ट असायला हवं, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज 'कर्मयोगी साधना सप्ताह २०२६' या कार्यक्रमाला व्हिडीओ संदेशाद्वारे संबोधित करत होते. आजचं प्रशासन 'नागरिक देवो भव' या मंत्राने प्रेरित असून, सार्वजनिक सेवा अधिक सक्षम, संवेदनशील आणि नागरिक-केंद्रित करण्यावर यात स्पष्ट भर देण्यात आल्याचं ते म्हणाले.

**'होल्ड बाईट (11.02.57)' - प्रधानमंत्री**

**<><><><>**

अमेरिकेतल्या फ्लोरिडा इथल्या केनेडी स्पेस सेंटरमधून आज सकाळी पावणे चारच्या सुमारास नासाचे चार अंतराळवीर चांद्र मोहिमेसाठी झेपावले. नासाच्या आर्टेमिस २ या मोहिमेत रीड वाइसमन, व्हिक्टर ग्लोव्हर, क्रिस्टिना कोट आणि कॅनडीय अंतराळवीर जेरेमी हॅन्सन हे सहभागी झाले आहेत. हे अंतराळवीर एका मिनीबसच्या आकाराच्या कॅप्सूलमधून प्रवास करणार आहेत.

**<><><><>**

सूर्याच्या पृष्ठभागाचा अभ्यास करण्यासाठी भारताने हाती घेतलेल्या आदित्य -L1, या अंतराळ मोहिमे अंतर्गत प्राप्त झालेल्या माहितीचा अभ्यास करण्यासाठी इस्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने भारतीय सौर भौतिकशास्त्र समुदायाकडून प्रस्ताव मागवले आहेत. त्यानुसार, भारतीय संस्था, विद्यापीठं किंवा महाविद्यालयांमध्ये कार्यरत असलेले भारतीय शास्त्रज्ञ आणि संशोधक प्रस्ताव सादर करू शकतील.

'आदित्य-L1' ने गोळा केलेला २५ टीबी पेक्षा जास्त डेटा सध्या उपलब्ध असून, त्याबाबतचे महत्त्वाचे निष्कर्ष आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित झाले आहेत.

**<><><><><>**

पुदुच्चेरी आणि ४ राज्यातल्या निवडणुकांसाठी प्रचार जोमाने सुरु आहे.

पश्चिम बंगाल आणि आसाममधे भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा आज प्रचार करत आहेत.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या तमिळनाडूत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचार करणार आहेत. केरळमधे एलडीएफ ने आणि यू डीएफने आज निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केला. काँग्रेसचे नेते राहुल गांधी, प्रियंका गांधी, रेवंत रेड्डी यांच्यासह अनेक नेत्यांच्या प्रचारसभा होत आहेत.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधल्या मालदा जिल्ह्यात तीन महिला अधिकाऱ्यांसह सात न्यायिक अधिकाऱ्यांना ओलीस ठेवण्याच्या घटनेची आज सर्वोच्च न्यायालयानं गंभीर दखल घेतली. ही घटना अत्यंत निंदनीय असून या प्रकरणी न्यायालयानं राज्याचे गृह सचिव, पोलीस महासंचालक आणि इतर अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण मागितलं आहे. न्यायिक अधिकाऱ्यांना घाबरवून निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणण्याचा हा प्रयत्न आहे, असं मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठानं म्हटलं आहे. गरज पडल्यास सीबीआय किंवा एनआयएच्या चौकशीची मागणी करण्याची परवानगी न्यायालयानं निवडणूक आयोगाला दिली आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना ईडन गार्डन्स मैदानावर कोलकाता नाईट रायडर्सचा आणि सनराईजर्स हैद्राबाद यांच्यात होणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामना सुरु होईल.

काल लखनौ इथं झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं लखनऊ सुपर जायटंस संघाचा ६ गडी राखून पराभव केला. लखनऊ सुपर जायटंसच्या संघानं प्रथम फलंदाजी करतांना १४१ धावा केल्या. दिल्ली कॅपिटल्सनं विजयासाठीचं १४२ धावांचं लक्ष्य १७ षटकात चार गडी गमावून पूर्ण केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात गारपीट आणि वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. अरूणाचल प्रदेशात आज तर लडाख आणि जम्मू काश्मीरमधे उद्या अतिवृष्टीची शक्यता आहे. विदर्भ, दिल्ली, छत्तीसगड, हरयाणा,चंदीगड, केरळ, कर्नाटक, पंजाब, राजस्थान आणि उत्तराखंडमधे मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. आज विदर्भासह महाराष्ट्रात, छत्तिसगड आणि देशाच्या पूर्व भागात दिवसाच्या तापमानात घसरण होईल असाही हवामान विभागाचा अंदाज आहे.

**<><><><><>**

देशभरात आज हनुमान जयंती उत्साहात साजरी केली जात आहे. पहाटे जन्मोत्सव साजरा केल्यानंतर भाविकांनी ठिकठिकाणच्या मंदिरांमध्ये दर्शनासाठी गर्दी केली आहे. आज विविध मंदिरांमध्ये हनुमान चालिसा, सुंदर कांड आणि अखंड रामायण पठणाचं आयोजन केलं जातं.

महाराष्ट्रात समर्थ रामदास यांनी स्थापन केलेल्या ११ मारुती मंदिरांमधे तसंच गावोगावी हनुमान मंदिरांमधे उत्सवाचं आयोजन केलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला आणि गृहमंत्री अमित शहा यांनी देशवासियांना हनुमान जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

भगवान हनुमान हे भक्ती, शक्ती आणि संपूर्ण समर्पणाचं अद्वितीय असं प्रतीक असल्याचं **प्रधानमंत्री नरेंद्र मोदी** यांनी संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

ऑटिझम, म्हणजेच ‘स्वमग्नता’ असलेल्या व्यक्तींना केवळ समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणं पुरेसं नसून, त्यांना देशाचे सन्माननीय नागरिक म्हणून सक्षम बनवणं, ही आपली आपली सामायिक जबाबदारी असल्याचं राज्यसभा अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे.

**//<><><><><>//**